**पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - ९ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग,
चेंबुर, मुंबई-४०००७१
दुरध्वनी क्र. **022&25229303**
Email ID-
dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com




**प्रेस नोट**

दिनांक २९/०८/२०२६

(आरसीएफ पोलीस ठाणे)

**विषारी पदार्थ पाजुन खुन करुन अपघाती मृत्युचा बनाव करणा-या आरोपीचा डाव फोल, आरसीएफ पोलीसांच्या कसुन तपासातुन हत्येचे सत्य उघडकीस, आरोपी अटकेत**

दि. 25/08/2026 रोजी रात्री सुमारे 23.30 वा., म्हैसूर कॉलनी येथील बंगला क्र. 57-अ येथे विष्णुमाया या महिलेचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला होता. या प्रकरणात सुरुवातीस आरोपीने स्वतः गुन्हा करूनही सदर कृत्य त्याने केले नसल्याचे भासवून तसेच सदर घटना नैसर्गिक अथवा अन्य कारणामुळे घडल्याचा आभास निर्माण करुन पोलीस तपासांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, पोलिसांनी अत्यंत दक्षतेने व व्यावसायिक पद्धतीने तपास करून घटनेमागील सत्य उघडकीस आणले.

आर.सी.एफ. पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी घटनेची सर्व बाजूंनी बारकाईने पडताळणी केली. घटनास्थळावरील परिस्थिती, उपलब्ध माहिती, संबंधित व्यक्तींची चौकशी तसेच घटनेशी संबंधित परिस्थितीजन्य पुराव्यांचे सखोल विश्लेषण केले. तपासादरम्यान आरोपी आशिष मगर याने मृत महिलेच्या चारित्र्यावर संशय घेतल्याच्या कारणावरून तिला थम्सअप या शीतपेयामधून विषारी व घातक पदार्थ पिण्यास दिल्याने तिचा खुन केल्याचे निष्पन्न झाले.

फिर्यादी भीमा मित्रा रई उर्फ आशा, वय 40 वर्ष यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी आशिष मगर याच्याविरुद्ध आर.सी.एफ. पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र. 546/2026, कलम 103(1), भारतीय न्याय संहिता अन्वये दि. 28/08/2026 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद गुन्ह्यात आरोपीतास अटक करण्यात आली त्यास मा.न्यायालया समक्ष हजर केले असता मा.न्यायालयाने सदर आरोपीतास ०५ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेली असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक रामदास पाटील हे करीत आहेत. कायद्याच्या कचाट्यातुन कोणी सुटु शकत नाही, हे या प्रकरणातुन पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त ट्रॉम्बे विभाग प्रमोद कोकाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि रामदास पाटील, पोउपनि प्रेमनाथ महाजन, पोहवा विद्यानंद शिंदे, पोशि कृष्णात अवघडे, पोशि अमोल खटके, पोशि शुभम सनस, पोशि प्रशांत पाटील यांनी केली आहे.